दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.sahsik.com

वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा, गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!

वर्ष : १६ | अंक : १३९ शनिवार ०३ डिसेंबर २०२२ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

## स्वत:ला मृत सिद्ध करण्यासाठी कॉलगर्लची हत्या

**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**मुंबई:** उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगरमध्ये एका मुलीने आत्महत्या केली, 'मी माझ्या इच्छेने मरत आहे' अशी सुसाइड नोटही लिहून ठेवली आहे. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी मुलीच्या कुटुंबीयांनी घरात जळालेल्या चेहऱ्यासह मृतदेह पाहिला. मुलगी मेली असे समजून त्यांनी पोलिसांना न कळवता अंत्यसंस्कार उरकले. जिच्या नावाने अंत्यसंस्कार करण्यात आले ती मुलगी मेलेली नव्हती. तिने प्रियकरासह मिळून कॉलगर्लची हत्या करून पळ काढला. मृत तरुणीच्या भावाने पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केल्याने हा खून उघडकीस आला. आरोपी पायल आणि अजयने फिल्मीस्टाइलमध्ये खून केला. आधी दोघांनी कॉल गर्लचा गळा चिरला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी पायलने मृतदेहाला स्वत:चे कपडे घातले. एवढेच नाही तर स्वत:ला मृत सिद्ध करता यावे म्हणून त्याचा चेहरा ॲसिडने जाळला.

## जीएसटी विभागाकडून ५०० कोटींचा घोटाळा उघड

**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

संभाजीनगर: राज्यातील ५०० कोटीचा घोटाळा संभाजीनगर जीएसटी विभागानं उघड केला आहे. या घोटाळ्याची व्यापती अगदी १ हजार कोटी आणि त्यापेक्षाही जास्त असू शकते अशी शक्यता जीएसटी विभाग व्यक्त करत आहे. १८ कोटींची करचोरीचा तपास करताना हे घबाडच राज्य जीसटीच्या हाती सापडलं आहे. देशभरात कर चोरी करणारी हे मोठं रॅकेट असल्याचा जीएसटी अधिकाऱ्यांना संशय आहे. तेव्हा जाणून घेऊया की प्रकार नेमका काय आहे. जीएसटा घोटाळ्यात गेल्या काही वर्षातील मोठी कामगिरी संभाजीनगर विभागानं केली आहे. शहरातील एक भंगार व्यापाऱ्याच्या १८ कोटींच्या टॅक्सची चौकशी सुरु होती. त्यातून संशय आल्यानं याची सखोल चौकशी विभागानं सुरु केली. संभाजीनगरच्या भंगार कंपनीच्या पत्त्यावर छापा टाकल्यावर ते गोडाऊन नाही तर एत इमारतीतील फ्लॅट असल्याचं उघड झालं आणि संशय बळावला.५०० असा झाला तपास

संभाजीनगरच्या फ्लॅटचं रेंट (उर्वरित पान २ वर)

### दिनविशेष

जागतीक अपंग सहाय्यता दिन

### सुविचार

सत्तेशिवाय शहाणपन काय कामाचे!

### चारोळी

सख्या रे काय सांगु तुला
जीव माझाच मजवरी उधार झाला
या वेड्या सखीने तर तो ही
मजपासुनी दुर नेला

### हसा जरा जपून..

गणपतीला दोन बायका असतात रिद्धी आणि सिद्धी
सामान्य माणसाला एकच बायको असते आणि ती पण जिद्दी

# कोरोना लसींच्या दुष्परीणामामुळे मृत्यू व इतर त्रास भोगणाऱ्या नागरिकांना व परिवारांना स्थानिक न्यायालयात नुकसान भरपाईसाठी केसेस दाखल करण्याचा मार्ग मोकळा

* नागरिकांना लसींचे जीवघेणे दुष्परीणाम आधीच सांगितले असल्यामुळे व नागरिकांना लस घेण्याचे कोणतेही बंधन किंवा जबरदस्ती केंद्र सरकार ने न केल्यामुळे झालेल्या दुष्परीणामाची जबाबदारी घेण्यास केंद्र सरकारचा नकार.
* लसीचे दुष्परीणामाने मरण पावलेले व इतर त्रास सोसणाऱ्या नागरिकांनी दोषी लस कंपनी, आणि सरकारच्या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कनिष्ठ न्यायालयात केस / दावे दाखल करण्याचा केंद्र सरकारचा सल्ला.
* थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास केंद्र सरकारचा आक्षेप. ४. केंद्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयातील शपथपत्र खोटे असल्याचे पुरावे सादर असल्याचा ॲड. निलेश ओझा यांचा दावा.
* खोटे शपथपत्र दाखल करणाऱ्यां डॉ. वीणा धवन यांच्याविरुद्ध कोर्ट अवमानना आणी भादवि १९१,१९२, १९३, २०१, २१८, ४०९, ४७१, ४७४, १२० (B), ३४ अंतर्गत कारवाईची मागणी.
* सिंगापूर सरकारने लसीमुळे हृदयाचा त्रास होण्यान्या मुलाच्या परिवारास १ कोटी ७८ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली आहे. आपल्या सरकारने नुकसान भरपाई न दिल्यास तर देशभर जनआंदोलन करण्याचा श्री. प्रकाश पोहरे व विविध संघटनांचा यांचा ईशारा.



ॲड. निलेश ओझा

**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**नवी दिल्ली:** कोरोना लसींच्या दुष्परिणामाने मरण पावलेले व इतर आजार झालेल्या नागरिकांना व मृतकाच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मिळण्याकरीता स्थानिक न्यायालयात दीवाणी दावे व फौजदारी केसेस दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्याबाबत केन्द्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले आहे.

कोरोना लस घेणाऱ्या तरुणांमध्ये हृदयविकाराने मृत्यूचे प्रमाण खूप वाढत असून लस घेणाऱ्यांना किडनीचे आजार, लकवा, अर्धांगवायू, सांधेदुखी, आंधळेपणा, बहिरेपणा, मस्तीष्का संबंधीचे आजार, मधुमेह अश्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून आता त्या सर्वांना नुकसान भरपाईसाठी स्थानिक न्यायालयात किंवा पोलिसात तक्रार दाखल करून न्याय मागता येणार आहे.

याबाबत पालकांनी दाखल विविध याचिकांमध्ये उच्च व सर्वोच्च न्यायालयाने केंद्र व राज्य सरकारला नोटीस काढून त्यांचा जबाब मागविला होता.

तसेच १००० कोटी रुपये नुकसान भरपाईची नोटीस सीरम इन्सीट्यूट चे अदार पुनावाला, बिल गेटस तसेच डॉ. रणदीप गुलेरीया आदी लोकांनाही नोटिसेस काढण्यात आल्या होत्या.

सर्वोच्च न्यायालयातील रचना गंगू [Writ Petition (C) No. १२२० of २०२१. मध्ये केंद्र शासनातर्फ दि. २३.११.२०२२ रोजी शपथपत्र दाखल करण्यात आले असून त्यामध्ये शपथपत्र दाखल करणाऱ्या डॉ. विणा धवन यांनी खोटे शपथपत्र दाखल केल्याचा आरोप सर्व स्तरातून होत आहे.

डॉ. विणा धवन यांनी आपल्या शपथपत्रात असे खोटे नमूद केले आहे की, सरकारने सर्व जनतेला कोरोना लसींचे जीवघेणे व इतर दुष्परिणामांबाबत आधीच स्पष्ट माहिती दिली होती व कोणत्याही व्यक्तीला लस घेण्यासाठी कोणतीही जबरदस्ती किंवा निर्बंध लादण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नागरिकांना लसींपासून होणारे दुष्परीणामाकरीता केंद्र सरकारला जबाबदार धरता येणार नाही. सरकारचे स्वतःचेच रेकॉर्ड व न्यायालयीन आदेशावरून हे स्पष्ट व सिद्ध झाले आहे की, लोकांना सरकारी अधिकारी व डॉक्टरांनी लसीचे कोणतेही दुष्परीणाम सांगितले नसून त्यांना लस पूर्णतः सुरक्षित आहे असे खोटे सांगून सर्वांना लस देण्यात आली. तसेच लस घेतली नाही तर लोकल ट्रेन, राशन, पगार आदी सुविधा बंद करण्याचे निर्बंध आणून लोकांना लस घेण्यास भाग पाडले.

सरकारचे असे निर्बंध गैरकायदेशीर व असंवैधानिक ठरवून ते सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांनी खारीज केले. त्यामुळे सरकारचे दोन्ही दावे प्रथमदर्शनीय खोटे ठरतात.

डॉ. वीणा धवण यांचे शपथपत्र खोटे असल्याचे संपूर्ण देशाला माहीत असून त्याबद्दल अधिक पुरावे सादर करून त्यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी न्यायालयात व योग्य त्या प्राधिकरणाकडे करण्यात येणारे असल्याची माहिती ॲड. निलेश ओझा यांनी दिली.

कायद्यातील तरतुदीनुसार आरोपींना वाचविण्यासाठी खोटे दाखल करणारा सरकारी अधिकारी हा भादवि १९१, १९२, १९३, १९९, २००, २०१, २१८, ४०९, १२० ( B ), ३४ आदी कलमाअंतर्गत ७ वर्ष ते आजीवन कारावासाच्या शिक्षेच्या कारवाईस पात्र ठरतो.

अश्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोर्ट अवमानना कायद्याअंतर्गत कारवाई होवून त्यांना अतीरीक्त सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा होवू शकते.

नागरिकांना लस पूर्णतः सुरक्षित आहे असे खोटे बोलून व निर्बंध घालून लस घेण्यास भाग पाडण्यात येत असल्याचे देशातील सर्वे जनतेने पाहिले आहे. त्याबाबत इंडियन बार अससोसिएशन, अव्हेकन इंडिया मुव्हमेंट व विविध संघटनांनी देशभर आंदोलने केली तसेच उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातून आदेशही मिळविले. दुसऱ्या देशात आणी नें 'ष्ठ ने सुद्धा लसींच्या दुष्परिणामांबाबत नुकसान भरपाईची घोषणा केली आहे. बाहेरील देशातील नागरिकांनी कोट्यावधींची नुकसान भरपाई मिळाली आहे. असे असतानां खोटेपणा करून नागरिकांना नुकसान भरपाई देण्यास जर सरकार टाळाटाळ करीत असेल तर देशभर जनआंदोलन करण्यात येईल आणि दोषी अधिकारी व मंत्र्यांना त्यांची जागा दाखवू असा इशारा या आंदोलनाचे वरिष्ठ नेते श्री. प्रकाश पोहरे यांनी दिला.

## सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गोल्डी ब्रारला अटक



**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**नवी दिल्ली:** प्रसिद्ध पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला यांची भरदिवसा ३० गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्येनंतर संपूर्ण देशभर खळबळ उडाली होती. दरम्यान, मुसेवाला यांच्या हत्येची जबाबदारी घेतलेला मुख्य आरोपी गोल्डी ब्रार याला कॅलिफोर्नियात अटक करण्यात आली आहे. भारतीय गुप्तचर संस्थांना याबाबतची माहिती मिळाल्याचे म्हटले जात आहे.


सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गोल्डी ब्रार याला कॅलिफोर्नियात अटक करण्यात आल्याचे म्हटले जात आहे. भारताच्या रॉ, आबी, पोलिसांचे विशेष पथक, पंजाप इंटेलिजन्स यांना याबाबतची माहिती मिळाल्याचे म्हटले आजत आहे. मात्र कॅलिफोर्निय सरकारने या अटकेबाबत अद्याप कोणतीही रितसर माहिती दिलेली नाही.

**गोल्डी ब्रार कोण आहे?**

कॅनडातील गॅंगस्टर गोल्डी ब्रार याने सिद्धू मुसेवाला यांच्या हत्येची जबाबदारी उचललेली आहे. त्याने ही हत्या गॅंगस्टर लॉरेन्स बिष्णोई याच्यासोबत मिळून केली होती. कॅनडात राहून भारतातील तुरुंगात बंद कैद्यासोबत संगनमत करून त्याने हे हायप्रोफाईल हत्याकांड घडवून आणले होते. या हत्येनंतर पोलीस त्याच्या शोधात होते.

सिद्धू मुसेवालांवर ३० गोळ्या (उर्वरित पान २ वर)

## चिन्ह कोणतेही असले, तरी शिवसेना जिंकणार: संजय राऊत म्हणाले-गद्दारांची पोरं हातावर 'मेरा बाप चोर हैं' लिहितील



**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**नाशिक:** शिवसेना सोडून गेलेल्या ४० आमदार आणि १२ खासदारांची पोरं हातावर मेरा बाप चोर हे लिहितील, असे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले आहे. नाशिकमध्ये पत्रकार परिषदेत बोलत असताना त्यांनी शिंदे गटावर जहरी टीका केली आहे.

शिवसेनेचे ४० आमदार आणि १२ खासदार गेले, मात्र शिवसेना पक्ष तिथेच आहे. स्थानिक स्वराज्य संघटनेच्या निवडणुका राज्य सरकार टाळते आहे, ते केवळ भीतीपोटी टाळत आहे, असे म्हणत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदेंवर निशाणा साधला आहे.

शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी नाशिकमध्ये पत्रकारपरिषद घेत शिंदे गटावर जोरदार टीकास्त्र डागले आहे. निवणुकीला चिन्ह नवे असले मशाल असले तरी जनता शिवसेनच्या उमेदवारांनाच निवडून देणार आहे, असा विश्वास राऊतांनी व्यक्त केली आहे. लोकांमध्ये प्रंचड अशी चीड निर्माण झाली आहे, शिवसेनेला यामुळे कुठेही तडा गेला नाही. मात्र आता जे आमदार, खासदार शिवसेनेतून बाहेर पडले त्यांनी पुन्हा निवडून येऊन दाखवावे असे म्हणत शिंदे गटाला आव्हान दिले आहे. हा पालापाचोळा गेला असेही राऊतांनी म्हटले आहे. जनता शिंदे गटातील लोकांना गद्दार आणि खोके वाले म्हणते असे सांगताना संजय राऊत यांनी टीका केली आहे.

**मर्दासारखे फिरून दाखवा**

काही दिवसांपूर्वीच वैजापूरचे फुटलेल्या आमदारांना महालगावमध्ये केवळ चप्पल मारायचे ठेवले होते, असे म्हटले आहे. सुरक्षा जास्त दिली आहे, पण पुढे त्यांचे भविष्य नाही असेही राऊत म्हटले. तर सुरक्षा काढून मर्दासारखे फिरून दाखवा असे आव्हानही राऊतांनी दिले

(उर्वरित पान २ वर)

## पुण्यात राज्यपालांना काळे झेंडे दाखवले:छत्रपती शिवाजी महाराजांवरील आक्षेपार्ह वक्तव्याचा स्वराज्य संघटना, राष्ट्रवादी, कॉंग्रेसकडून निषेध



**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**पुणे:** स्वराज्य संघटनेच्यावतीने राज्यपालांना काळे झेंडे दाखवत त्यांचा कार्यक्रम उधळण्याचा प्रयत्न शुक्रवारी करण्यात आला. परंतु कार्यक्रमाच्या ठिकाणी पोलिसांनी छावणीचे स्वरुप दिल्याने आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

स्वराज्य संघटना, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि युवक कॉंग्रेसच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. यात आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

स्वराज्य संघटनेचे प्रवक्ते डॉ. धनंजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात राज्यपालांना काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज व महापुरुषांच्या बाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या संदर्भात राज्यपालांचा निषेध करण्यात आला. 'राज्यपाल हटवा, अस्मिता वाचवा', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' घोषणा देत राज्यपालांचा निषेध करण्यात आला. यावेळी पोलिसांनी घोषणा देणाऱ्यांना रस्त्यातच अडवून त्यांच्या ताब्यातील काळे झेंडे घेण्याचा प्रयत्न केला.

तसेच राज्यपालांच्या ताफ्याच्या दिशेने जाण्यासाठी त्यांना अटकाव करण्यात आला. स्वराज्य संघटनेचे जे कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले त्यांना पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने ताब्यात घेतले आहे. राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्यानंतर विविध संघटना आक्रमक झाल्याचे चित्र राज्यभरात दिसून येत आहे.

खासदार उदयनराजे आणि संभाजी राजे यांनी राज्यपालांच्या विधानावरून त्यांच्यावर टीका करत, त्यांची राज्यपाल पदावरून हकालपट्टी करण्यात यावी अशा प्रकारची मागणी केंद्र सरकारकडे केलेली आहे. राज्यपालांनी महत्त्वाच्या पदावर असताना अशा प्रकारचे वादग्रस्त वक्तव्य करणे चुकीचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात खासदार उदयनराजे आक्रमक होत त्यांनी तीन डिसेंबर रोजी किल्ले रायगड येथे आक्रोश आंदोलन आयोजित केले आहे.

## तुकाराम मुंढेंच्या बदलीमागे आरोग्यमंत्री सावंत म्हणतात-बदलीमध्ये कोणताही सहभाग नाही



**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**मुंबई:** राज्याचे आरोग्य आयुक्त तुकाराम मुंढे यांची कुटुंब कल्याण विभागाच्या संचालकपदावरून बदली करण्यात आली. या बदलीमध्ये कोणताही सहभाग नाही असे स्पष्ट करत आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी हा विषय त्यांचया बाजूने संपवला आहे. मात्र, गेले काही दिवस त्यांच्यात उडणारे खटके यामुळे मुंढेंच्या बदलीमागे सावंत हे प्रमुख कारण आहे, अशी चर्चा रंगली आहे.

तुकाराम मुंढे कोणत्या खात्यात जाणार, हे अद्याप निश्चित झालेले नाही. मात्र, अवघ्या ५९ दिवसांत तुकाराम मुंढे यांची कुटुंब कल्याण विभागातून बदली झाल्याने पुन्हा एकदा चर्चेला सुरुवात झाली आहे. शिंदे सरकारने नवी नियुक्ती दिल्यानंतर दोनच महिन्यात तुकाराम मुंढेंना पुन्हा हटवण्यात आले असून त्यांच्याविरोधात लॉबी सक्रिय झाल्यामुळे सरकारने दबावातून ही बदली केल्याचे बोलले जात आहे.

**सावंतासोबत उडाले खटके**

तुकाराम मुंढेंना आरोग्य सेवा आयुक्त म्हणून पोस्टिंग मिळाली आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंतांचे खटके उडायला लागल्याच्या बातम्या समोर आल्या. मुंढे यांना आरोग्य खात्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आणले होते, मात्र मागील (उर्वरित पान २ वर)

## वंदे भारत एक्स्प्रेसचा पुन्हा अपघात, गुरांना धडकल्यामुळे समोरच्या भागाचे नुकसान



**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**नवी दिल्ली:** गुजरातमधील गांधीनगर ते मुंबई या मार्गावर प्रवास करणारी वंदे भारत एक्स्प्रेस पुन्हा एकदा जनावरांना धडकली आहे. उदवाडा आणि वापी रेल्वेस्थानकदारम्यान ही घटना घडली आहे. या अपघातात वंदे भारत एक्स्प्रेच्या समोरच्या काही भागाचे नुकसान झाले आहे. वंदे भारत एक्स्प्रेसच्या अपघाताची ही चौथी वेळ आहे. गुरुवारी (१ डिसेंबर) संध्याकाळी ही घटना घडली.

**नेमकं काय घडलं?**

**याआधी वटवा ते मनीनगरदरम्यान अपघात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवा कंदील दाखवल्यानंतर १ ऑक्टोबरपासून ही रेल्वे प्रवाशांच्या सेवेत दाखल झाली होती. सेवेत दाखल झाल्यानंतर अवघ्या सहाव्याच दिवशी 'वंदे भारत एक्स्प्रेस'ला अपघात घडला होता. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी सव्वा अकराच्या सुमारास वटवा ते मनीनगर दरम्यान हा अपघात घडला होता.

## 'हिंदू कधीही दंगलीत',आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांचं विधान



**वृत्तसंस्था / ०२ डिसेंबर**

**नवी दिल्ली:** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी लव्ह जिहाद, दंगल यावर महत्त्वाचे भाष्य केले आहे. हिंदू धर्मीय कधीही दंगलीत सामील होत नाहीत. हिंदू शांतताप्रिय आहेत, असे सोरेन म्हणाले आहेत. ते एनडीटीव्ही या वृत्तवाहिनीशी बोलत होते. विशेष म्हणजेय यावेळी त्यांनी श्रद्धा वालवकर खून प्रकरणातील आरोपी आफताब पुनावाला, गुजरात दंगल यावरही भाष्य केले.

लव्ह जिहादवर बोलताना शर्मा म्हणाले की, 'लव्ह जिहादकडे दुर्लक्ष करणे म्हणजे तुष्टीकरणाचे राजकारण केल्यासारखे मला वाटते. हा महिलांच्या सुरक्षेचा विषय आहे. लव्ह जिहादची अनेक प्रकरणं आहे. त्याबाबतचे अनेक पुरावेदेखील उपलब्ध आहेत. नुकत्याच झालेल्या श्रद्धा वालकर हत्या प्रकरणातील आरोपी आफताब पूनावालाना त्याचेच उदाहरण म्हणता येईल. माझ्या कृत्यामुळे मला जन्नतमध्ये स्थान मिळेल, असे मत पूनावालाचे आहे. पॉलिग्राफ टेस्टमधून हे समोर आले आहे,' असे शर्मा म्हणाले.

गुजरातमध्ये प्रचार करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी 'गुजरातमध्ये २००२ साली दंगल झाली. यातील दंगोलखोरांना भाजपाने धडा शिकवला आहे. त्यामुळे आजपर्यंत त्यांनी डोके
ठ ा र

(उर्वरित पान २ वर)